**आकाशवाणी पुणे**

**प्रादेशिक वृत्त विभाग**

**पुणे वृत्तांत**

**वेळ - संध्याकाळी 06.00 वा.**

**दिनांक- 11.12.2024** **वार – बुधवार**

---

**हॅकेथॉन**

एमआयटी आर्ट, डिजाईन आणि टेक्नॉलॉजी विद्यापीठामध्ये राष्ट्रीय स्मार्ट इंडिया हॅकेथॉन-२०२४ स्पर्धेचं आज उद्घाटन करण्यात आलं. यावेळी हार्डवेअर गटाच्या अंतिम फेरीचं उद्घाटन पुष्कराज ग्रुपचे अध्यक्ष आणि व्यवस्थापकीय संचालक शैलेन्द्र गोस्वामी यांच्या हस्ते करण्यात आलं. सध्या देशासमोर असणाऱ्या समस्यांचं निराकरण करण्यासाठी संशोधनाला चालना देण्याचं काम स्मार्ट इंडिया हॅकेथॉन या स्पर्धेच्या माध्यमातून होत आहे, त्याचा विद्यार्थ्यांनी पूरेपूर लाभ घ्यावा असं ते यावेळी म्हणाले.

**शांतता... पुणेकर वाचत आहेत**

पुणे पुस्तक महोत्सवाच्या निमित्तानं आज दुपारी 12 ते 1 या वेळेत आपल्या सर्वांसाठी शांतता... पुणेकर वाचत आहेत.. या अभिनव उपक्रमात अग्निशमन दल सहभागी झालं होतं. अग्निशमन दलाचे प्रमुख देवेंद्र पोटफोडे आणि जवान तसंच सर्व अग्निशमन केंद्रातील कर्मचाऱ्यांनी सहभाग घेत पुस्तक वाचन केलं.

**पादचारी दिन**

पुणे महापालिकेतर्फे आज लक्ष्मी रस्त्यावर पादचारी दिन साजरा करण्यात येत आहे. पादचाऱ्यांची सुरक्षा आणि त्यांच्या अधिकारांबाबत जागृती करण्यासाठी गेल्या चार वर्षांपासून हा उपक्रम आयोजित केला जातो. हा उपक्रम राबवणारी पुणे महानगरपालिका ही देशातील पहिली आणि एकमेव महापालिका आहे. शाश्वत वाहतूक यात प्रामुख्यानं चालणं, सायकल आणि बस मेट्रोचा अधिकाधिक वापर करण्याबद्दल आवाहन करणं तसंच लोकप्रबोधनासाठी मनोरंजनात्मक कार्यक्रमांद्वारे लोकांचा सहभाग वाढवण्यावर यात भर दिला आहे. पुण्यातील महत्त्वाचा लक्ष्मी रस्ता वाहन विरहित करून इथं महापालिकेद्वारे विविध कार्यक्रम आयोजित केले आहेत.

**ससून**

बीड जिल्ह्यातल्या अंबाजोगाईमधील स्वामी रामानंद तीर्थ शासकीय रुग्णालयात बनावट औषधं पुरवण्यात आल्याच्या प्रकारात बंदी घालण्यात आलेल्या विशाल एंटरप्रायजेसकडून ससून रुग्णालयालाही औषधांचा पुरवठा झाल्याचं समोर आलं आहे. या पार्श्वभूमीवर सध्या उपलब्ध असलेल्या सर्व औषधांची चाचणी अन्न आणि औषध प्रशासनाकडून करून घेण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत अशी माहिती ससून रुग्णालयाचे वैद्यकीय अधीक्षक डॉक्टर यल्लपा जाधव यांनी दिली.

**ऊस**

ऊस वाहतूक वाहनांकडून रस्ता सुरक्षिततेचे नियम पाळले जावेत याबाबत साखर कारखान्यांनी ऊस वाहतूकदारांना जबाबदारीची जाणीव करून द्यावी, अशा आशयाचं पत्र सर्व साखर कारखान्यांना पुणे प्रादेशिक परिवहन कार्यालयाकडून देण्यात आलं आहे.  साखर कारखाने सुरू झाल्यानंतर रस्त्यावर ऊस वाहतूक वाहनांची संख्या वाढते, अपघातांची संख्याही याच काळात मोठी असते. याबाबत आरटीओ अधिकाऱ्यांनी विविध भागात अपघातांची कारणे शोधली असता वाहतूक नियमांचं पालन न केल्यामुळं अपघात होत आहेत.

**क्षयरोग**

महाराष्ट्र क्षयरोगमुक्त करण्यासाठी राष्ट्रीय क्षयरोग निर्मुलन कार्यक्रमाच्या माध्यमातून शंभर दिवसाची मोहिम राबविण्यात येत आहे. यामध्ये महाराष्ट्रातील 17 जिल्हे आणि बारा महापालिकांमध्ये सार्वजनिक आरोग्य विभागाकडून ही मोहिम राबविण्यात येत आहे. मोहिमेमध्ये अधिकाधिक क्षय रूग्ण शोधणं आणि त्यांच्यावर उपचार करणं, मृत्यूदर कमी करणं आणि त्याचा प्रसार तपासणे यावर लक्ष केंद्रीत केलं जाणार असल्याचं पुणे क्षयरोग आणि कुष्ठारोग विभागाचे सहसंचालक डॉक्टर संदीप सांगळे यांनी सांगितलं.

**पोर्टल**

पिंपरी चिंचवड महापालिकेच्या विविध तक्रार निवारण प्रणालींवर आलेल्या तक्रारींचा आणि त्यावर संबंधित विभागामार्फत केलेल्या कार्यवाहीचा आढावा आयुक्त शेखर सिंह यांनी घेतला. प्राप्त तक्रारी जाणीवपूर्वक प्रलंबित ठेवल्यास विभागप्रमुखांवर कारवाई करण्यात येईल, असा इशाराही आयुक्त सिंह यांनी यावेळी दिला. संबंधित विभागानं तक्रारींचा प्राधान्यक्रम ठरवून त्यांचं विहीत वेळेत निराकरण केलं पाहिजे. निराकरण केल्यानंतर त्याची नोंद संबंधित पोर्टलवर देखील तंत्काळ घेतली गेली पाहिजे, अशा सूचना आयुक्त सिंह यांनी यावेळी दिल्या.

**स्थायी**

पिंपरी चिंचवड महापालिकेच्या स्थायी समितीच्या बैठकीत विविध विकास कामांच्या खर्चाला मंजुरी देण्यात आली. यशवंतराव चव्हाण स्मृती रुग्णालयातील रुग्णांच्या नातेवाईकांना रात्रनिवारा केंद्र अल्प दरात उपलब्ध देण्याचा समावेश आहे. गरजू तसंच आर्थिक दुर्बल नातेवाईकांना रात्र निवाऱ्याची आवश्यकता असल्यास त्यांना अत्यंत अल्प दरात रात्र निवाऱ्याची सुविधा उपलब्ध करून देण्यात येणार आहे.

**हेल्मेट**

सार्वजनिक बांधकाम प्रादेशिक विभागाअंतर्गत सार्वजनिक बांधकाम मंडळ कार्यालयाच्या वतीनं आयोजित रस्ते सुरक्षितता अभियान आणि जागृती कार्यक्रमाच्यावेळी मुख्य अभियंता अतुल चव्हाण यांच्या हस्ते विभागातील 15 अधिकारी आणि कर्मचाऱ्यांना प्रातिनिधिक स्वरुपात हेल्मेटचं वितरण करण्यात आलं.

**फुटबॉल**

पश्चिम भारत फुटबॉल संघटनेद्वारे जळगाव इथं सुरु असलेल्या आंतरजिल्हा फुटबॉल कनिष्ठ मुलींच्या फुटबॉल स्पर्धेत पुण्याच्या संघानं सातारा संघाचा 9-0 असा धुव्वा उडवत उपांत्य फेरीत धडक मारली. आर्या चौधरी, याशिका तेजवानी आणि केया तेलंग यांनी प्रत्येकी दोन गोल केले. उपांत्य फेरीत  पुण्याचा सामना कोल्हापूरशी होईल.

**हा होता आजचा पुणे वृत्तांत. उद्या पुन्हा भेटू विविध भारती पुणे केंद्रावर, संध्याकाळी सहा वाजता, ताज्या पुणे वृत्तांतमध्ये, नमस्कार.**